# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्तविभाग
# राष्ट्रीय बातमीपत्र
# सकाळी 08 वाजून 30 मिनिटं

**दिनांकः24.10.2024** **वारःगुरुवार**

---

**ठळक बातम्या**

1 ) ब्रिक्स देशांनी एकत्र येऊन दहशतवाद आणि दहशतवादाला रसद पुरवणाऱ्या यंत्रणेशी सामना केला पाहिजे, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच ब्रिक्स शिखर परिषदेत आवाहन

2 )भारत आणि चीन दरम्यानचे वाद योग्य पद्धतीने हाताळून शांतता बिघडू न देण्याच पंतप्रधानांनी व्यक्त केल मत

3 ) दाना चक्रीवादळ आज रात्री ओडीशाच्या तटीय क्षेत्रावर धडकण्याची शक्यता , सर्व प्रशासकीय यंत्रणा सज्ज

आणि

4 ) 20 षटकांच्या आशियाई चषक क्रिकेट स्पर्धेत भारतीय अ संघाचा ओमानवर 6 गडी राखून विजय आणि उपांत्य फेरीत प्रवेश

**पंतप्रधान**

ब्रिक्स देशांनी एकत्र येऊन दहशतवाद आणि दहशतवादाला रसद पुरवणाऱ्या यंत्रणेशी, सामना केला पाहिजे असं आवाहन पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी काल केलं. रशियामधल्या कझ्झान इथं १६व्या ब्रिक्स परिषदेच्या सत्राला ते संबोधित करत होते. युवकांमध्ये वाढता कट्टरतावाद रोखण्यासाठी पावलं उचलण्याची गरज असल्याचं सांगत संयुक्त राष्ट्राच्या अधिवेशनात झालेल्या दहशतवादविरोधी ठरावांवर, ठोस काम करण्याची गरज त्यांनी व्यक्त केली. सायबर सुरक्षेसाठी उपाययोजना करणं आवश्यक असल्याचं ते म्हणाले तसच महागाई आटोक्यात आणणं, अन्नसुरक्षा, ऊर्जा, आरोग्य हे सर्व देशांसाठी प्राधान्याचे मुद्दे आहेत,अस ही मोदी यांनी सांगितल

**पंतप्रधान**

भारत आणि चीनमधले मतभेद आणि वाद योग्य पद्धतीने हाताळून, दोन्ही देशांनी शांतता बिघडू न देणं, महत्वपूर्ण असल्याचं मत पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी काल व्यक्त केल . रशियातील कझ्झान इथं सोळाव्या ब्रिक्स शिखर परिषदेच्या पार्श्वभूमीवर, पंतप्रधान मोदी आणि चीनचे राष्ट्राध्यक्ष शी जिनपिंग यांच्यात द्विपक्षीय बैठक झाली , त्यावेळी पंतप्रधानानी हे मत व्यक्त केल . या बैठकीत भारत-चीन

सीमाप्रश्नावर तोडगा काढून शांतता प्रस्थापित करण्यासाठी, दोन्ही देशांचे विशेष प्रतिनिधी लवकरच भेटतील, असं निश्चित करण्यात आलं. भारत आणि चीन यांच्यातल्या स्थिर आणि सौहार्दपूर्ण द्विपक्षीय संबंधांचा प्रादेशिक आणि जागतिक शांतता तसंच समृद्धीवर सकारात्मक परिणाम होईल, असंही मोदी यांनी सांगितल.

**पंतप्रधान**

ब्रिक्स शिखर परिषदेनं काल संयुक्त राष्ट्र आणि बहुपक्षीय संस्थांच्या सुधारणांना मान्यता देणारा कझान जाहीरनामा मंजूर केला. ब्राझील, रशिया, भारत, चीन आणि दक्षिण आफ्रिका या देशांचा ब्रीक्स समूह आहे. या जाहीरनाम्यामुळे  आर्थिक क्षेत्रातील सहकार्य वाढीस लागून राष्ट्रीय चलनात व्यापार करणे सुलभ होणार असल्याचं, भारताचे  आर्थिक व्यवहार मंत्रालायचे सचिव दामू रवी यांनी माध्यमांशी बोलतांना सांगितल.
दरम्यान,  ब्रिक्स शिखर परिषदेत भाग घेऊन पंतप्रधान मोदी काल रात्री उशिरा नवी दिल्लीत परतले. या परिषदे दरम्यान पंतप्रधान मोदी यांनी चीनचे राष्ट्राध्यक्ष शी जिंगपीन , रशियाचे राष्ट्राध्यक्ष ब्लादिमीर पुतिन , इराण चे नवनिर्वाचित राष्ट्रपती मसूद पेज़ेशकियान, उज्बेकिस्तानचे राष्ट्रपती शौकत मिर्जियो येव, आणि संयुक्त अरब अमिरातीचे राष्ट्रपती शेख मोहम्मद बिन जायद अल नाहयान या नेत्यांबरोबर द्विपक्षीय बैठक घेऊन चर्चा केली

**राजनाथ**

“चाणक्य संरक्षण संवाद” या आंतरराष्ट्रीय चर्चासत्राच्या दुसऱ्या भागाचं उद्घाटन आज संरक्षणमंत्री राजनाथ सिंह यांच्या हस्ते नवी दिल्लीत होणार आहे. भारतीय लष्कराच्या पर्यावरणपूरक हरित उपक्रम आणि डिजिटायझेशन या उपक्रमांची औपचारीक पायाभरणी ते करतील आणि उपस्थितांना संबोधित करतील. विकसित भारत 2047 हे ध्येय साध्य करण्यासाठी, सर्वसमावेशक सुरक्षितता आणि विकास या विषयावर संरक्षणमंत्री  यावेळी आपले विचार मांडणार आहेत.
दोन दिवस चालणाऱ्या या चर्चासत्रात धोरणकर्ते, शिक्षणतज्ज्ञ, संरक्षण अधिकारी आणि शास्त्रज्ञ एकत्र येऊन विचारमंथन करतील. अमेरिका, रशिया, इस्रायल आणि श्रीलंका या संवादात सहभागी होणार आहे.

**मन की बात**

पंतप्रधान नरेंद्र मोदी येत्या 27 तारखेला मन की बात या आकाशवाणीवरील मासिक कार्यक्रमातून नागरिकांशी संवाद साधणार आहेत. कार्यक्रमाचा हा 115 वा भाग आहे. श्रोते येत्या 25 तारखेपर्यंत टोल फ्री क्रमांक, नमो ॲप किंवा मायजीओव्ही ओपन फोरम वरून आपली मतं, सूचना पाठवू शकतात.

**चक्रीवादळ**

पूर्व मध्य बंगालच्या खाडी दरम्यान निर्माण झालेल, दाना चक्रीवादळ आज रात्री उशिरा किंवा उद्यापर्यंत, भीतरकनिका आणि धामरा दरम्यान ओडिशा राज्याच्या तटिय क्षेत्रावर धडकण्याची शक्यता असून, ताशी 100 ते 120 किलोमीटर वेगाने वारे वाहण्याची शक्यता आहे. यामुळे ओडिशातील केंद्रपाडा, बालासोर आणि  भद्रक  या जिल्ह्यामध्ये मोठ नुकसान होण्याचा अंदाज, असून मुसळधार पाऊस पडण्याची शक्यता आहे. तसच इतर 11 जिल्ह्यातही कमी अधिक प्रमाणात पावसाची शक्यता हवामान विभागाने वर्तवली आहे. भारतीय तटरक्षक दलानं चक्रीवादळाच्या तडाख्यापासून जीवित आणि मालमत्तेचं नुकसान टाळण्यासाठी, अनेक प्रतिबंधात्मक उपाययोजना राबविल्या आहेत. या पार्श्वभूमीवर एनडीआरएफनं ओडिशात २० आणि पश्चिम बंगालमध्ये १३ पथकं तैनात केली आहेत. आंध्रप्रदेश, छत्तीसगड आणि झारखंडमध्येही राखीव पथकं ठेवण्यात आली आहेत. चक्रीवादळ धडकण्यापूर्वी  जास्तीत जास्त लोकाचं स्थलांतर करण्यात येत आहे. भुवनेश्वर इथल्या बिजू पटनाईक आंतर राष्ट्रीय विमानतळावरील सर्व विमान उड्डाणे,  आज संध्याकाळी पाच वाजल्यापासून ते उद्या सकाळी 9 वाजेपर्यंत रद्द करण्यात आली आहेत.  तसच अनेक रेल्वेगाड्याही रद्द करण्यात आल्या आहेत . राज्यातल्या सर्व शाळा , महाविद्यालयांना सुट्टी देण्यात आली असून सरकारी कर्मचारी आणि  डॉक्टरांच्या सुट्ट्या रद्द  करण्यात आल्या आहेत. कोणत्याही आपत्कालीन परिस्थितीचा सामना करण्यासाठी सर्व यंत्रणा सज्ज आहेत.

**डिजिटल व्यवहार**

देशातल्या नागरिकांकडून रोख रकमेचा वापर कमी होत असल्याचं,  रिझर्व्ह बँकेनं म्हटलंय. गेल्या 3 वर्षात डिजिटल व्यवहारांचं प्रमाण 19 टक्क्यांवरून, 48 टक्क्यांपर्यंत वाढलं आहे. यात यूपीआयचा वाटा महत्त्वाचा आहे, असं भारतीय रिझर्व्ह बँकेच्या अर्थतज्ज्ञांच्या एका शोधनिबंधात म्हटलं आहे. 2016 मध्ये सुरू झालेल्या यूपीआयचा,  गेल्या 5 वर्षांत किरकोळ डिजिटल व्यवहारांत सर्वाधिक वाटा आहे. खरेदी करताना डिजिटल पद्धतीनं पैसे देण्याचं प्रमाण ६ पटीनं वाढलं आहे. दोन व्यक्तींमधलं निधी हस्तांतरणंही मोठ्या प्रमाणात वाढल्याचं या अहवालात म्हटलं आहे.

**कम्यूनिटी रेडियो**

कम्यूनिटी रेडियोला देशात 20 वर्षं पूर्ण होत असल्याचं औचित्य साधून पश्चिमेकडील राज्यांच्या, कम्यूनिटी रेडियो परिषदेला आज राजस्थानातल्या जयपुर इथं सुरवात होत आहे. माहिती आणि प्रसारण मंत्रालय आणि भारतीय जनसंचार संस्था यांनी संयुक्तपणे या परिषदेचं आयोजन केलं आहे. या दोन दिवस चालणाऱ्या परिषदेत महाराष्ट्र, मध्य प्रदेश, गुजरात आणि राजस्थान सहभागी होत असून कम्यूनिटी रेडियोशी संबंधित प्रश्नांवर यावेळी चर्चा केली जाईल.

**महाविकास आघाडी**

महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीसाठी, महाविकास आघाडीतला जागावाटपाचा तिढा सुटला असून तिन्ही प्रमुख पक्षांना प्रत्येकी 85 जागा देण्यात आल्याची माहिती, महाविकास आघाडीकडून काल पत्रकार परिषदेत देण्यात आली. यावेळी कॉंग्रेसचे प्रदेशाध्यक्ष नाना पटोले, शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाकडून संजय राऊत, राष्ट्रवादी कॉंग्रेस शरदचंद्र पवार पक्षाकडून जयंत पाटील उपस्थित होते.खासदार संजय राऊत यांनी याबद्दलची माहिती पत्रकारांना दिली. उर्वरित 18 जागा महाविकास आघाडीमधल्या इतर घटक पक्षांना देण्यासंदर्भात आज चर्चेला सुरुवात होईल, अशीही माहिती यावेळी देण्यात आली.

**क्रिकेट**

पुरुषांच्या 20 षटकांच्या आशियाई चषक क्रिकेट स्पर्धेत, काल भारताच्या अ संघाने यजमान ओमानचा 6 गडी राखून पराभव केला. ओमान संघाने भारतासमोर ठेवलेल 140 धावांच आव्हान भारतीय संघाने 28 चेंडू शिल्लक असतानाच पूर्ण केल. भारताच्या आयुष बदोनी याने अर्ध शतक झळकावत हा विजय साकार केला. या विजयामुळे भारतीय अ संघाचा उपांत्य फेरीत प्रवेश झाला असून, आता त्यांचा सामना आज अफगाणिस्तानच्या अ संघाबरोबर होणार आहे.

**क्रिकेट**

भारत आणि न्यूझीलंड यांच्या दरम्यान होणारा दूसरा क्रिकेट कसोटी सामना आज सकाळी पुण्यात सुरू होत आहे. तीन सामन्यांच्या या मालिकेत न्यूझीलंडनं पहिला सामना जिंकला आहे. रोहित शर्माच्या नेतृत्वाखालील भारतीय संघ हा सामना जिंकून बरोबरी करण्याचा प्रयत्न करेल. भारतीय संघात अष्टपैलू खेळाडू, वॉशिंग्टन सुंदरचा समावेश करण्यात आला आहे.

**याबरोबरच हे राष्ट्रीय बातमीपत्र संपल , नमस्कार**